महाराष्ट्र शासन

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (०२०) २६१२२२१७

जा.क्र./उमाशि-४०१/१२ वी प्रवेश-२०-२१/पुवि/२०२०/३७७८
दिनांक :- 18 AUG 2020

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील इ.१२वी प्रवेशाबाबत**

संदर्भ:- शासनाचे पत्र जा.क्र.प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३(भाग-१)एसडी-२ दि.११.०८.२०२०.

उपरोक्त शासनाचे संदर्भिय विषयाचे पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांकडून दरवर्षी विविध कारणास्तव इ.१२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळण्याबाबत मागणी होते, य संदर्भात सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून, कनिष्ठ महाविद्यालय मंजुर जागांच्या मर्यादेमध्ये व जागा उपलब्ध असण्याच्या अटीनुसार खालील कारणांसाठी इ.१२ वी करीता विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे.

२) पालकांची बदली होणे.

३) वैद्यकीय कारणास्तव राहत असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळणे.

४) शाखा बदलून मिळणे.

५) विद्यार्थी राहण्याचा पत्ता बदलणे.

६) इ.१२ वी मध्ये विद्यार्थ्यास बोर्ड बदलायचे असल्यास,

तथापि, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या डाटाबेसमध्ये, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्याची कार्यवाही संबधित महाविद्यालयांनी करणे आवश्यक राहील.

**(मीना शेंडकर)**
**सचिव,**
**इ.११ वी विभागीय प्रवेश नियंत्रण समिती**
**तथा**
**सहा.शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग पुणे-१**

प्रत माहितीसाठी सविनय सादर

**१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.**

**२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे-१.**

12thadmission 2020-21

Scanned with CamScanner